


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ ▮ अंक १७६ ▮ मंगळवार ३१ मार्च २०२६ ▮ पाने ४ ▮ मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322





## भगवान महावीरनिमित्त नगरमध्ये शोभायात्रा

**त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की असा जयघोष । आनंदधामच्या प्रांगणात साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात महावीर स्वामींचे गुणगान, विविध स्पर्धांचे बक्षिसे जाहीर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिंसा परमो धर्म: अशा महान उपदेश देत संपूर्ण जगाला दिशा देणाऱ्या भगवान महावीर स्वामींची जयंती (जन्मकल्याणक) मंगळवारी नगरमध्ये विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त सकाळी सकल जैन समाजातर्फे शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. याशिवाय चौक सजावट, रांगोळी स्पर्धाही घेण्यात आली. आनंदधामच्या पवित्र प्रांगणात साधूसाध्वीजींनी भगवान महावीर स्वामी यांच्या जीवन चरित्रावर प्रवचन दिले.

भगवान महावीर दिनी सकाळी ७.३० वाजता कापड बाजार जैन मंदिरापासून भव्य प्रारंभ झाला. या शोभायात्रेत सनई, नगारा, चौ बॅण्ड पथक, डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले, मुली, त्यानंतर पांढरे वस्त्र परिधान केलेले पुरुष व लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. भगवान महावीर स्वामींची भव्य प्रतिमा असलेले वाहन रथ व शेवटी अनुकंपा गाडीही होती. आनंद संस्कार शिक्षा अभियान मंडळाच्या मुला मुलींनी आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच त्यांनी हातात जैन ध्वज व भगवान महावीरांचे संदेश असलेले फलक घेवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कापडबाजार जैन मंदिर येथून निघालेली शोभायात्रा शहरातील विविध मार्गांवरून धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदधाम येथे दाखल झाली. शोभायात्रा मार्गावर विविध मंडळे, जैन भाविकांनी आकर्षक चौक सजावट केली होती. रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या काढून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की अशा घोषणा देण्यात आल्या.

आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवतर्क कुंदनऋषीजी महाराज, प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज, पूज्य आलोकऋषीजी ▮ **पान ४ वर**

ठेकेदाराचा गलथानपणा जीवावर बेतला

## घोडेगाव स्वतंत्र पाणीयोजनेच्या तलावात तीनजण बुडाले

**एकाचा मृतदेह हाती, दोघांचा शोध सुरू । ठेकेदाराच्या निष्काळजीपणाबद्दल संताप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर – नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे काम सुरू असलेल्या घोडेगाव स्वतंत्र पाणीयोजनेच्या तलावात तीनजण बुडाल्याची घटना आज, मंगळवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. यातील एकजणाचा मृतदेह हाती लागला असून, तो घोडेगाव येथील रहिवासी आहे. दरम्यान, ठेकेदाराला वारंवार सूचना देऊनही त्याने काम सुरू असलेल्या ठिकाणी माहितीफलक न लावल्यामुळे तीनजणांच्या जीवावर बेतले असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे.

## उपमहापौर धनंजय जाधव यांनी सादर केला ५० दिवसांचा कार्य अहवाल

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून कौतुक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. धनंजय कृष्णा जाधव यांनी आपल्या पदाची धुरा हाती घेतल्यापासून अवघ्या ५० दिवसांच्या कालावधीत केलेल्या विकासकामांचा आणि उपक्रमांचा लेखाजोखा असलेला कार्य अहवाल राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना नुकताच सादर केला.

याप्रसंगी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिलजी माहिते, जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, दादासाहेब सोनमाळी, काका धांडे, स्वप्नील दगडे यांच्यासह भाजपचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहवालातील प्रमुख ठळक बाबी:

उपमहापौर धनंजय जाधव यांनी या ५० दिवसांच्या अल्प कालावधीत शहराच्या मूलभूत प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले आहे. अहवालात प्रामुख्याने खालील विभागांमधील कामांचा समावेश आहे:

आरोग्य विभाग: शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या. नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण करण्यावर भर दिला.

स्वच्छता मोहीम: स्वच्छ नगर, सुंदर नगर या संकल्पनेतून शहराच्या विविध भागांत स्वच्छता मोहिमेला गती दिली. कचरा व्यवस्थापन आणि ड्रेनेज प्रश्नांवर तातडीने कार्यवाही केली.

शिक्षण विभाग: मनपा शाळांच्या दर्जा सुधारणेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांसाठी विशेष पाठपुरावा केला. हॉस्पिटल पाहणी: शहरातील सरकारी रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सोयीसुविधांची पाहणी केली. रुग्णांना मिळणाऱ्या वागणुकीबाबत आणि औषधोपचाराबाबत प्रशासनाला कडक सूचना दिल्या.

पालकमंत्र्यांकडून कामाची ▮ **पान ४ वर**

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस तात्काळ अटक करा

**अन्यथा रास्ता रोकोचा इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बहुजन समता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव सकट यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दिनांक ३० मार्च २०२६) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. कर्जत तालुक्यातील रातंजन येथील मातंग समाजातील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी मध्ये नमुद केलेल्या संबंधित व्यक्तीला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे,काळे याने संबंधित मुलीला फसवून काळे यांच्या बंगल्याजवळील जुन्या खोलीत नेऊन तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. तसेच, हा प्रकार कुणालाही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ००९६/२०२६ नुसार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमे, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण () कायदा तसेच अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, अद्यापही संबंधित व्यक्तीला अटक करण्यात आलेली नसल्यामुळे पीडित मुलगी व तिच्या कुटुंबीयांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे. यावेळी वसंतराव सकट म्हणाले की, ‘‘पीडित मुलीला न्याय मिळाला पाहिजे. संबंधित व्यक्तीला त्वरित अटक न झाल्यास ▮ **पान ४ वर**

## कत्तलीसाठी चालविलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका

**एलसीबीची काष्टी परिसरात कारवाई । चौघांवर गुन्हा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे कत्तलीसाठी चालविलेल्या पाच गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुटका केली. या कारवाईत ७ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलीसीबीचे पथक दिनांक ३० रोजी श्रीगोंदा परिसरात पेट्रोलींग करीत असतांना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काष्टी ते श्रीगोंदा रोडने एका पिकअपमधून गोवंशीय जनावरे कत्तल करण्यासाठी नेण्यात येत आहेत. त्यानुसार पथकाने काष्टी ते श्रीगोंदा रोडवर सापळा रचून संशयित पिकअप थांबवला. त्यात २ लाख १० हजार रुपये किमतीची पाच गोवंशीय जनावरे मिळून आली.

वाहनचालक सोहम यशवंत टिळे (वय– २१ वर्षे रा. टिळेवाडी, ता. दौंड जि.पुणे) याच्याकडे चौकशी केली असता त्याने साथीदार ओंकार दशरथ सायकर (रा. राहु थोरली विहीर, ता.दौंड जि.पुणे) असे आम्ही दोघांनी जनावरे विकत घेऊन हिम्मत कुरेशी (रा.धाराशिव) व शोएब ताहेर कुरेशी (रा.खडकत ता.आष्टी जि.बीड) यांच्या सांगणेवरून कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची कबुली दिली. या प्रकरणी चारजणांवर श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस फरार तिघांचा शोध घेत आहेत.

या कारवाईत पाच गोवंशीय जनावरे व महिंद्रा पिकअप (एमएच २३. एयू ००४३) तसेच मोबाईल असा एकूण ७ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे,अंमलदार सुयोग सुपेकर, दीपक घाटकर, पंकज व्यवहारे, प्रकाश मांडगे, रोहित येमुल यांच्या पथकाने केली.

## संतांच्या आशीर्वादाने सेवा कार्याला मिळते सातत्य – उपमहापौर धनंजय जाधव

**जैन सोशल फेडरेशनतर्फे आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ‘दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया विनाटाका’ शिबिराने मेगा शिबिराचा यशस्वी समारोप महिन्याभरात ४७४७ रुग्णांची तपासणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कोणतेही सामाजिक कार्य करताना संतांचा आशीर्वाद लाभणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा आशीर्वादामुळेच कार्यात सातत्य आणि प्रामाणिकपणा टिकून राहतो. अहिल्यानगर ही संतांची भूमी असून, येथे अनेक संतांनी मानवतेचा संदेश दिला आहे. त्याच विचारांना पुढे नेत आनंद ऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेचे कार्य करत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले.

जैन सोशल फेडरेशनच्या वतीने श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व. कन्हैयालालजी व स्व. मानकवरबाई कांकरिया यांच्या स्मरणार्थ डॉ प्रकाश कांकरिया व डॉ सुधा कांकरिया यांच्यावतीने आयोजित ‘दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया विना टाका’ या शिबिराचे उद्घाटन उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, मानकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा ,डॉ आशिष भंडारी यांच्यासह तज्ञ डॉक्टर डॉ भास्कर जाधव ,डॉ महेश घुगे ,डॉ रविद्र मुथा उपस्थित होते.

उपमहापौर जाधव पुढे ▮ **पान ४ वर**

## एमआयडीसीतील कंपनीच्या मालाची परस्पर विल्हेवाट लावणारे दोघे ताब्यात

**वाहनचालकासह विक्री प्रतिनिधीने अफरातफर केल्याचे निष्पन्न**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर एमआयडीसी येथील गोदरेज कंपनीच्या मालाची अफरातफर करुन परस्पर विल्हेवाट लावणा–या दोघा वाहनचालकांना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. अंबादास शंकर दराडे (वय– २८ वर्षे रा. सांगवी खुर्द, पागोरी पिंपळगांव, ता. पाथर्डी) व देविदास तुकाराम साबळे (वय– २६ वर्षे रा. शेकटे, मारुती मंदिराच्यामागे ता. पाथर्डी) अशी आरोपींची नावे आहेत.

याबाबत वैभव चंद्रकांत मचाले (वय– ४५ वर्षे रा. आनंदनगर हौसिंग सोसायटी गुलमोहर रोड) यांनी फिर्याद दिली होती. दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अखेर शिल्लक असलेला गोदरेज कंपनीचा माल दिनांक १ ते ७ जानेवारी दरम्यान वडगांव गुप्ता शिवारातील गोडावूनमधून गोदरेज कंपनीच्या व्हॅनमधून हलविण्यात आला. यावेळी विक्री प्रतिनिधी (सेल्स रिप्रेझेन्टेटिव्ह) अंबादास शंकर दराडे व वाहनचालक देविदास तुकाराम साबळे यांनी वेळोवेळी घेऊन गेलेल्या मालापैकी २ लाख ७७ हजार ३११ रुपये किमतीच्या मालाची अफरातफर करून परस्पर विल्हेवाट लावली. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

एलसीबीचे पथक पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेत असताना गोपनीय माहितीनुसार अंबादास दराडे यास राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीनुसार शेकटे गावात जाऊन देविदास साबळे याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाणे करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील सपोनि हरीश भोये, पोलीस अंमलदार सुरेश माळी, विष्णु भागवत, फुरकान शेख, सागर ससाणे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक भगवान धुळे यांच्या पथकाने केली. ▮ **पान ४ वर**

## दै. आकर्षण निवडक

### ओम सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी अशोक गायकवाड




अहिल्यानगर- बालिकाश्रम रोड परिसरातील ओम सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी निवृत्त बँक अधिकारी ॲड. अशोक गायकवाड यांची तर सचिवपदी श्री. नवनाथ कुऱ्हे यांची निवड झाली. रविवारी झालेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुप गत सोळा वर्षापासून नागरिकांना चालण्याचे आणि आरोग्याचे महत्त्व पटवून देत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून ग्रुपतर्फे गरजूंना मदत केली जाते. ही निवड एक वर्षासाठी राहणार आहे. या बैठकीला संस्थापक अध्यक्ष अविनाश जोशी, माजी सचिव संजय मुदगल, निवृत्त कार्यकारी अभियंता जयप्रकाश संचेती, रमेश बोरुडे, गोविंद खेर्डेकर, मधुकर साबळे, ॲड. बबनराव सुंबे आदी उपस्थित होते.

### शहापूरला हिंदुस्तान पेट्रोलियमच्या आनंद पेट्रोल पंपावर ग्राहकास मारहाण

अहिल्यानगर - नगर-पाथर्डी रोड, शहापूर येथील येथील हिंदुस्तान पेट्रोलियमचे आनंद पेट्रोल पंप येथे डिझेलचे बिल मागितल्याच्या कारणावरून ग्राहकाला व त्याच्या मित्राला लोखंडी रॉडने मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. ३० मार्च) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी विशाल राजेंद्र बेरड (वय २३, रा. सोनेवाडी, ता. जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते पेव्हर ब्लॉक व जेसीबी मशीन व्यवसाय करतात आणि आपल्या मशिनसाठी नियमितपणे हिंदुस्तान पेट्रोलियमचे आनंद पेट्रोल पंप येथून डिझेल घेत असतात. दि. २९ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास विशाल बेरड हे आपल्या मित्र गणेश जरे याच्यासोबत मोटारसायकलवरून संबंधित पेट्रोल पंपावर डिझेल घेण्यासाठी गेले होते. त्यांनी सुमारे ३५०० रुपयांचे डिझेल प्लास्टिकच्या ड्रममध्ये भरून घेतले व त्याचे पैसेही दिले. मात्र, व्यवहारानंतर त्यांनी बिलाची मागणी केली असता, तेथील सेल्समन प्रशांत बेरड याने बिल देण्यास नकार दिला.यावरून वाद निर्माण झाला आणि प्रशांत बेरड याने शिवीगाळ सुरू केली. त्याचवेळी सागर बेरड हा हातात लोखंडी रॉड घेऊन आला व त्याने विशाल बेरड यांना हात, छाती, पाठ व पायावर जोरदार मारहाण केली. दरम्यान, मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या गणेश जरे यांनाही सागर बेरड याने लोखंडी रॉडने मारहाण केली.घटनेदरम्यान पेट्रोल पंपावरील इतर कर्मचारी किरण नाटक व निलेश बेरड यांनीही हस्तक्षेप करत फिर्यादी व त्यांच्या मित्राला बाहेर नेऊन लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, ''पुन्हा येथे डिझेल घेण्यासाठी आलात तर जिवे ठार मारू,'' अशी धमकीही देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### श्रीमती प्रमोदिनी कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन

अहिल्यानगर - येथील सावेडी नाका परिसरातील



आर्यावर्त अपार्टमेंटमधील रहिवासी श्रीमती प्रमोदिनी कमलाकर कुलकर्णी (नान्नजकर) यांचे वृद्धापकाळाने रविवारी रात्री उशिरा निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नाती, नातजावई, नातवंडे असा परिवार आहे. सोमवारी (दि. ३०) सकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते व कुलकर्णी क्लिनिक हिअरिंग एडचे संचालक आनंद कुलकर्णी तसेच रेल मेल सर्व्हिसमधील (आरएमएस) सेवानिवृत्त कर्मचारी प्रमोद कुलकर्णी व पुणे येथील नामांकित कंपनीतील अधिकारी प्रशांत कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

श्रीक्षेत्र निंबादैत्य संस्थाणचे विकासाबरोबरच

## सामाजिक क्षेत्रात ही मोठे योगदान – डॉ.सुभाष देशमुख



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र निंबादैत्य संस्थानचे विकासा बरोबराच सामाजिक क्षेत्रात ही मोठे योगदान आहे असे मत श्रीक्षेत्र निंबादैत्य संस्थान अध्यक्ष डॉ. सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दैत्यनांदुर श्री निंबादैत्य उच्चमाध्यमिक विद्यालय शालेय विद्यार्थी विकासासाठी मदत व तात्काळ अरोग्य सुविधे पासुन ऋग्न वंचित राहु नये अशा ऋगणांना संस्थान वतीने मदत करण्यात आली.

त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते यावेळी श्री निंबादैत्य उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्य किशोर पवार देवनाथ फाऊडेशन अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर दराडे उपस्थित होते यावेळी डॉ. देशमुख म्हणाले की निंबादैत्य संस्थाण वतीने दैत्यनांदुर गावासह देवस्थान परिसरातील ग्रामस्थांसाठी देवस्थान वतीने मोफत आरोग्य तपासणी महीला युवतिंचे हिमोग्लोबीन नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करून औषधासह देवस्थान वतीने मोफत सुविधा उपलब्ध करून दिल्या तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाणी फिल्टर इन्व्हर्टर सुविधा उपलब्ध तर स्पर्धा परिक्षांचे आयोजन गरजूवंताना संस्थान वतीने कपडे वाट शालेय साहीत्यासह गणवेश वाटप पाणी आडवा पाणी जिरवा संकल्पना प्रत्यक्षात साध्य करत ओढे नाले बंधारे उकरणे कामी मोठा सहभाग वृक्षारोपन करून प्रोत्साहनपर प्रसिद्ध मान्यवरांचे व्याख्यानाचे आयोजन कोरोना काळात कुटुंबांना किराणा किट वाटप तर मुख्यमंत्री सहायता निधी मदतीसाठी निंबादैत्य संस्थानचे मोठे योगदान अशा विविध संकल्पना राबवत श्रीक्षेत्र निंबादैत्य देवस्थान विकासाबरोबरच सामाजिक क्षेत्रात संस्थानचे मोठे योगदान आहे भविष्यातही संस्थानचे सामाजिक कार्य अविरत चालु राहील असे मत संस्थाण अध्यक्ष डॉ. सुभाष देशमुख यांनी संस्थान प्रगती आलेख आणि सामाजिक बांधिलकी पत्रकारांसमोर चर्चा करताना विषद केली.

## अंधारलेल्या आयुष्यांना आनंदऋषी नेत्रालय देत आहे जीवनात प्रकाश – सुरेंद्र लोढा

| आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्र तपासणी शिबिरात ४४५ रुग्णांची मोफत तपासणी
| आय बँक सुरु करण्याचा पुढाकार; ५ जिल्ह्यात २२ व्हिजन सेंटर कार्यरत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** व्याधीने ग्रासलेल्या दीन-दुबळ्या रुग्णांना नवजीवन देण्याचे आणि नेत्र विभागाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे कार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. अंधारलेल्या आयुष्यांना, जीवनात प्रकाश निर्माण होत असून, या हॉस्पिटलची आरोग्यसेवा रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत असून, ग्रामीण भागातील रुग्णांसाठी हे आरोग्यसेवेचे मंदिरच आधार ठरले आहे, असे प्रतिपादन सुरेंद्र लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त, संथाराव्रतधारी श्रीमती जयकुंवरबाई मोतीलालजी लोढा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लोढा परिवाराच्या वतीने आयोजित मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सविता लोढा, सुजाता लोढा, हेमा लोढा, मनिषा लोढा, देव लोढा, शोभा लोढा, अनिता लोढा, संजना लोढा, स्मिता लोढा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, नेत्र तज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. किरण शिंदे, डॉ. ऋषीकेश ठेरले आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलचा नेत्रालय विभाग अंधारलेल्या व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याचे कार्य सातत्याने करत आहे. सुसज्ज नेत्र विभाग व तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून दररोज शंभरपेक्षा जास्त डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होत आहेत. या नेत्रालयाने राज्यभरात रुग्णांचा मोठा विश्वास संपादन केला असून, मराठवाडा भागातील गरजू रुग्ण मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांत नेत्रालय विभागाची २२ व्हिजन सेंटर कार्यरत असून ग्रामीण भागात दारोदारी सेवा पोहोचवली जात आहे. तारकपूर येथे नव्याने नेत्र विभाग कार्यान्वित करण्यात आला असून पुढील टप्प्यात आय बँक सुरू करण्याचे स्वप्न साकार करण्यात येणार आहे. नेत्रदानाच्या माध्यमातून अनेकांचे अंधत्व दूर करण्यासाठी हॉस्पिटल प्रयत्नशील आहे, असे त्यांनी सांगितले. या कार्यात लोढा परिवाराचे मोलाचे योगदान लाभत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. वसंत कटारिया यांनी लोढा परिवाराची माहिती देताना सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात हा परिवार सक्रियपणे सहभागी झाला आहे. निखील लोढा जबाबदारीने व मनापासून काम करत असून, हा परिवार सेवाभावी व धार्मिक वृत्तीचा आहे. त्यांच्या योगदानामुळे नेत्र विभागाला अल्पावधीत मोठे यश मिळाले आहे.

संतोष बोथरा म्हणाले की, ग्रामीण भागातील दृष्टीदोष असलेल्या रुग्णांच्या वाडी-वस्तीवर जाऊन त्यांना हॉस्पिटलमध्ये आणणे, शस्त्रक्रिया करून पुन्हा घरी सोडणे, असे कार्य सातत्याने केले जात आहे. हे कार्य एका मिशनप्रमाणे राबविले जात असून, राज्यात अग्रेसर असलेल्या संस्थांमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलचा समावेश होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रतिक कटारिया यांनी सांगितले की, तारकपूर येथे सुसज्ज नेत्र विभाग सुरू करण्यात आला असून, उपनगरातील नागरिक तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांची सोय करण्यात आली आहे.

## योगीत ब्राइट अँड व्हाईट डेंटल क्लिनिकचा राष्ट्रीय फॅमडेंट अवॉर्ड्समध्ये ऐतिहासिक विजय

### डेंटल ऑस्करने सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** भारतीय दंतचिकित्सा क्षेत्रातील ऑस्कर मानला जाणारा प्रतिष्ठित फॅमडेंट डेंटल एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ सोहळा २१ मार्च २०२६ रोजी नेस्को एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे दिमाखात पार पडला. या सोहळ्यात देशभरातील दिग्गज दंतवैद्यक आणि संशोधक उपस्थित होते. महाराष्ट्राच्या दंतचिकित्सा क्षेत्रासाठी ही रात्र ऐतिहासिक ठरली, कारण अहिल्यानगरमधील योगीत ब्राइट अँड व्हाईट डेंटल क्लिनिक ने राष्ट्रीय स्तरावर पदार्पण करत नेत्रदीपक यश संपादन केले. भारतीय दंत उद्योगातील सर्वोच्च मानाचा मानल्या जाणाऱ्या या सोहळ्यात, देशातील सर्वोत्तम क्लिनिक्सच्या स्पर्धेत या क्लिनिकने अव्वल विजेते म्हणून नाव कोरले.

डॉ. गीतांजली सोनावणे आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर यांच्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वाखाली चालणाऱ्या या क्लिनिकला खालील प्रतिष्ठित श्रेणीमध्ये विजेते () म्हणून घोषित करण्यात आले:

हा विजय अत्यंत महत्त्वाचा आहे कारण या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात विजेत्यांच्या पॅनेलमध्ये स्थान मिळवणारे योगीत ब्राइट अँड व्हाईट डेंटल क्लिनिक हे अहिल्यानगरमधील पहिलेच क्लिनिक ठरले आहे. या यशामुळे भारताच्या उच्च दर्जाच्या आणि एलिट दंत आरोग्य सेवांच्या नकाशावर अहिल्यानगरचे नाव अभिमानाने कोरले गेले आहे.

क्लिनिकचे यश केवळ उपचारांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचेही कौतुक करण्यात आले. बेस्ट डेंटल क्लिनिक इंटिरियर (नॉन-मेट्रोपॉलिटन) या श्रेणीसाठी देखील क्लिनिकला नामांकन मिळाले होते. दिग्गज दंत तज्ज्ञांच्या ज्युरींनी भारतभरातील शेकडो अर्जांचे मूल्यमापन केले. यामध्ये प्रगत क्लिनिकल प्रोटोकॉल, निर्जंतुकीकरण, रुग्णांची सोय, सौंदर्यात्मक उत्कृष्टता आणि मेट्रो शहराबाहेर उपलब्ध करून दिलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान या निकषांवर क्लिनिकची निवड करण्यात आली.

अहिल्यानगरसाठी मार्गदर्शक ठरलेल्या डॉ. गीतांजली यांनी सोहळ्यानंतर सांगितले की, ''आमचे उद्दिष्ट नेहमीच अहिल्यानगरमध्ये दंतचिकित्सेचे जागतिक मानक आणण्याचे राहिले आहे, जेणेकरून आमच्या रुग्णांना प्रगत उपचारांसाठी मोठ्या शहरांमध्ये जावे लागणार नाही. फॅमडेंटमध्ये आमच्या शहरातून पहिले विजेते ठरणे हा आमचा सन्मान असून हा अभिमान आम्ही आमचे सर्व दंत सहकारी आणि रुग्ण समुदायासोबत साजरा करत आहोत.''

फॅमडेंट एक्सलन्स अवॉर्ड्स हे गुणवत्तेचा मानदंड मानले जातात आणि या विजयामुळे योगीत ब्राइट अँड व्हाईट डेंटल क्लिनिक आता देशातील अग्रगण्य दंत उपचार केंद्रांपैकी एक म्हणून ओळखले जाणार आहे.

सावेडी पोस्ट कार्यलयामध्ये स्वच्छता अभियान

## महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सावेडी परिसरातील पोस्ट कार्यालयामध्ये स्वच्छता अभियानासोबतच महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच महिला सन्मानाचा संदेश दिला गेल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. विशेषतः पोस्टमास्तर किशोर नेमाने यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम आदर्श ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पोस्ट कार्यलय परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. आवारातील कचरा साफ करून परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. राज्य शासन 'लाडक्या बहिणी' योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान देत असताना, केंद्र शासनाशी निगडित असलेल्या पोस्ट खात्याच्या सावेडी कार्यालयानेही महिलांना प्राधान्य देत त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून एक नवा पायंडा पाडत आदर्श निर्माण केला आहे.

सावेडी उपनगरातील पोस्ट कार्यालय नुकतेच अद्ययावत करण्यात आले असून, आधुनिक सुविधांमुळे नागरिकांचा पोस्ट सेवांवर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पैसे भरणे, बचत खाते व्यवहार तसेच विविध आर्थिक सेवांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ येथे पाहायला मिळते. अशा परिस्थितीत सामाजिक उपक्रम हाती घेतल्याने सावेडी पोस्ट कार्यालयाचे महत्त्व अधिक वाढले असून सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या उपक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने, पोस्टमन शुभम गायके, प्रदीप हिंगे, तनुजा सोनवणे, अनुष्का वालझाडे, उमेश सोनवणे, राहुल साबळे, भाऊराव शेलार, अजिंक्य खराड, अक्षय अजबे, अशोक लाळगे, बाळासाहेब गाडे, आजिनाथ खेडकर, हरीश गांगुर्डे, रियाज सय्यद, सलीम सय्यद, सचिन जाधव, एमटीएस जावेद शेख, पल्लवी हदगळ मॅडम तसेच इलियाज शेख यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण ज्या ठिकाणी काम करतो तो परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. आज महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून आम्ही महिला सन्मानाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य शासन महिलांना सन्मान देत असताना, आपणही त्याला प्रतिसाद देत समाजात सकारात्मक बदल घडवणे गरजेचे आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज असून, लावलेली झाडे जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांतून पोस्ट विभाग समाजाशी नाते अधिक दृढ करेल,'' असे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमातून चार महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आले. स्वच्छता ही दैनंदिन सवय बनवणे, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व त्यांचे संगोपन करणे, महिलांना सन्मान व संधी देणे आणि शासकीय कार्यालयांनी सामाजिक जबाबदारी पार पाडत समाजासमोर आदर्श निर्माण करणे हे त्यामध्ये प्रमुख होते.

## लक्ष्मीकारंजा येथे भव्य हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन; विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील लक्ष्मीकारंजा परिसरातील श्री संकटमोचन मारुती मंदिरात यंदाचा हनुमान जन्मोत्सव २०२६ मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने विविध धार्मिक तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ३१ मार्च रोजी सायंकाळी ८:३० वाजता श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होऊन सामूहिक पठणाद्वारे भक्तिरसाचा अनुभव घेणार आहेत.

त्याच दिवशी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत अष्टविनायक ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा हेतू असून नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. धार्मिकतेसोबतच समाजसेवेचा संदेश देणारा हा उपक्रम विशेष ठरणार आहे.

दि. २ एप्रिल रोजी पहाटे ५:४० वाजता श्री मारुती जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडणार असून, त्यानंतर सकाळी ११:३० वाजता महाआरती व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी अपेक्षित असून सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे नम्र आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. भक्ती, सेवा आणि एकात्मतेचा संगम साधणारा हा उत्सव शहरातील धार्मिक वातावरण अधिक मंगलमय करणार आहे.

## एलपीजी 'गो गॅस' दरवाढीविरोधात रिक्षा चालकांचा एल्गार; पूर्वीचे दर लागू करण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने एलपीजी 'गो गॅस'च्या वाढत्या दरांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र निषेध नोंदवण्यात आला. शहरात एलपीजी गॅसचे दर दुप्पटपेक्षा जास्त वाढवून सुमारे १०० रुपयांपर्यंत नेण्यात आल्याने रिक्षा चालकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, युद्धपूर्वीचा ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर दर तात्काळ लागू करावा, अशी मागणी करण्यात आली.

संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२६ पूर्वी एलपीजी 'गो गॅस'चा दर ४२.५० रुपये प्रति लिटर होता. मात्र इराण-अमेरिका संघर्षानंतर दररोज दरवाढ होत जाऊन आज ते शंभरी पार गेले आहेत. केंद्र व राज्य सरकार दरवाढ होणार



नसल्याचे सांगत असताना गॅस कंपन्या कोणाच्या आदेशाने दरवाढ करत आहेत, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

रिक्षा चालकांचा आरोप आहे की, गॅस दरवाढीसोबतच गॅस भरण्यातही हेराफेरी होत असून, अपेक्षित मायलेज मिळत नाही. त्यामुळे एकीकडे जास्त दर आणि दुसरीकडे कमी अवरेज अशा दुहेरी फटक्यामुळे चालकांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. दिवसभर मेहनत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या रिक्षा चालकांच्या उपजीविकेवर याचा गंभीर परिणाम होत आहे.

सरकारने तेल व गॅस कंपन्यांवर नियंत्रण ठेवून दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, तसेच वाहनधारकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय रिक्षा चालकांसाठी प्रभावी आणि स्वावलंबी कल्याणकारी मंडळ स्थापन करून त्यासाठी ठोस कायदेशीर तरतुदी कराव्यात, अशीही मागणी संघटनेने केली.

राज्य शासनाने रिक्षा-टॅक्सी कल्याणकारी मंडळाची घोषणा केली असली, तरी त्यासाठी आवश्यक नियम व निधीची तरतूद अद्याप केलेली नाही. तसेच सभासद नोंदणीसाठी सक्ती केली जात असल्याचा आरोप करून ही सक्ती तात्काळ थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

या मोर्चात संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश तात्या घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नारीस खान, सुधाकर साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षा चालक सहभागी झाले होते.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिंसा बाइक रॅलीचे आयोजन सकल जैन व राजस्थानी समाजाचा सहभाग



अहिल्यानगर- भगवान महावीर स्वामी यांच्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त सकल राजस्थानी युवा मंच (ट्रस्ट) व महिला मंच यांच्या वतीने अहिंसा बाइक रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:२० वाजता आयोजित करण्यात आली असून रॅलीची सुरुवात आनंद धाम येथून होणार आहे. समाजात एकोपा, बंधुभाव आणि अहिंसेचा संदेश देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत तसेच पेट्रोल बाइक सहभागी होऊ शकतात. रॅलीत मोठ्या संख्येने सकल जैन व राजस्थानी समाजातील युवक-युवती, महिला व समाजबंधू सहभागी होणार आहेत. रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे राहणार आहे आनंद धाम मार्केट यार्ड चौक इम्पिरियल चौक माळीवाडा वेस बंगाल चौकी धरती चौक करसट जी रोड रामचंद्र खुंट डाळमंडई चितळे रोड दिल्ली गेट नेप्ती चौक आयुर्वेद कॉलेज टिळक रोड स्वस्तिक चौक आनंद धाम रॅलीसाठी ड्रेस कोड निश्चित करण्यात आला असून पुरुषांसाठी पांढरा व महिलांसाठी लाल रंग ठरविण्यात आला आहे. आयोजकांनी समाजातील सर्व सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन अध्यक्ष सन्देश मुनोत यांनी केले आहे.

### प्रणव संजय निलांगे सीए परीक्षा उत्तीर्ण



अहिल्यानगर - नगर जिल्ह्यामधील कर्जत, ता. जि. अहिल्यानगर येथील संजय निलांगे (सनी टेलर्स) यांचे चिरंजीव प्रणव निलांगे हे सीए परिक्षा उत्तीर्ण झाले असून, सध्या पुणे (पुनावळे) तसेच त्यांची कन्या सौ. ऋतुजा निलांगे ६ वर्षापूर्वी सीए झाली आहे. एक सर्वसामान्य टेलर्स काम करणारे श्री. निलांगे यांच्या कष्टाचे मुलाने व मुलीने यश प्राप्त केले आहे. या दोघांचे पुणे, नगर, कर्जत येथे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### भोंदूगिरीविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक



अहिल्यानगर- राज्यात तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात वाढत चाललेल्या भोंदूगिरीच्या प्रकारांवर तात्काळ अंकुश आणावा आणि अशा भोंदू बाबांना मिळणारा राजकीय वरदहस्त कायमचा संपवावा, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात भोंदू बाबांचा वाढता प्रभाव ही गंभीर बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. अघोरी प्रथा, आर्थिक लूट आणि महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांनी जिल्ह्यासह राज्यभर उच्छाद मांडल्याचा आरोपही करण्यात आला. निवेदनात विशेषतः असा आरोप करण्यात आला की, अनेक भोंदू बाबांना स्थानिक तसेच राज्य पातळीवरील काही राजकीय नेत्यांचा आश्रय मिळत आहे. स्वार्थासाठी काही राजकारणी अशा बाबांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतात, त्यामुळे या प्रवृत्तीला सामाजिक व कायदेशीर संरक्षण मिळते. परिणामी, पोलीस प्रशासनावर दबाव येऊन कारवाईत टाळाटाळ होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीने प्रशासनासमोर काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. भोंदू बाबांना आश्रय देणाऱ्या राजकीय पदाधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी, पोलिसांना राजकीय दबावापासून मुक्त ठेवण्यासाठी विशेष आदेश द्यावेत, गुन्हे दाखल असलेल्या बाबांच्या कार्यक्रमांना परवानगी नाकारावी, तसेच संबंधित प्रकरणांचा तपास सीआयडी किंवा एसआयटीमार्फत करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

# संत विचारांमधूनच सुसंस्कृत समाजाची निर्मिती – ह.भ.प. प्रांजलताई जाधव

**नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हरिनाम सप्ताहात प्रांजलताई महाराज जाधव यांची कीर्तन सेवा**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. प्रांजलताई महाराज जाधव यांची कीर्तन सेवा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. या कीर्तनातून संत परंपरेचे महत्त्व, नामस्मरणाची ताकद आणि सुसंस्कृत समाज निर्मितीचा संदेश देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रांजलताई महाराज जाधव म्हणाल्या की, कलियुगात आपला जन्म झाला असून या युगातील वाईट प्रवृत्तींचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे समाजाला संतांच्या विचारांची नितांत गरज आहे. पुढील पिढी सुसंस्कृत घडवायची असेल तर संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत सावता महाराज, संत एकनाथ महाराज यांच्या विचारांचा प्रसार युवकांपर्यंत करणे आवश्यक आहे. संत विचारांमधूनच समाजाला ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा मिळते.

त्या पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र ही साधुसंतांची पावन भूमी असून भक्ती कशी करावी याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे श्री हनुमान आहेत. भगवंताच्या नामामध्ये अपार शक्ती असून नामस्मरणाने जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. आजच्या काळात आपण परमार्थामध्येही स्वार्थ शोधू लागलो आहोत, ही चिंतेची बाब आहे. देव, देश आणि धर्म यांच्याव्यतिरिक्त कीर्तनामध्ये दुसरे काहीही स्थान नाही. आपण सर्वजण वारकरी संप्रदायाचे पाईक आहोत आणि एकादशीचे व्रत हे अत्यंत महान असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, कीर्तनाच्या माध्यमातून मनुष्याच्या जीवनातील दुःख दूर होऊन त्याला आनंदी व समाधानी जीवन जगण्याची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. शहरातील धकाधकीच्या जीवनामुळे अनेकांना कीर्तन ऐकण्यासाठी वेळ मिळत नसला तरी अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे मनःशांती मिळते, असा संदेश त्यांनी दिला.

नालेगाव येथे माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या पुढाकारातून गेल्या अनेक वर्षांपासून हनुमान जयंतीनिमित्त हरिनाम सप्ताह व कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे शहरात धार्मिकतेचे वातावरण निर्माण होत असून नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

या प्रसंगी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल तसेच भाविक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावला

**। लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी**
**। स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी; चंद्रकांत झारगड यांचा इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** तालुक्यातील बालानगर, आडुळ, कडेठाण, नावगाव, आपेगाव, सायगाव, मायगाव, चांगतपुरी, पिंपळवाडी, कात्पुर, ढोरकीन परिसरात सोमवारी (दि. ३०) सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसासह गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या तडाख्यामुळे संपूर्ण परिसर अक्षरशः झोडपून निघाला. गेल्या दोन दिवसांपासून वातावरण ढगाळ होते.

सोमवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास जोरदार वादळासह पावसाला सुरुवात झाली. या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे शेतकरी व वाहनचालकांची एकच धावपळ उडाली. नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला.

या गारपिटीचा सर्वाधिक फटका शेतीला बसला असून गहू, हरभरा, टोमॅटो, हिरवी मिरची, कांदा, ज्वारी यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः मोसंबी व डाळिंब बागांचेही मोठे नुकसान झाले असून फळबागा अक्षरशः उद्ध्वस्त झाल्या आहेत. अनेक ठिकाणी आंब्याच्या कैऱ्या गळून पडल्या.

तसेच शेतात काढून ठेवलेला गहू भिजल्याने नुकसान झाले असून जनावरांसाठी साठवून ठेवलेला चाऱ्याचाही फटका बसला आहे. घराबाहेर बांधलेल्या जनावरांनाही गारपिटीचा मोठा तडाखा बसला. दरम्यान, काही ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे घरांवरील पत्रे उडाल्याच्या घटना घडल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते चंद्रकांत झारगड यांनी केली आहे.

# पवार यांनी गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला - आ. संग्राम जगताप

**सामाजिक कार्याची दखल घेऊन संदीप पवार यांना मानद डॉक्टर पदवी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधार सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच भाजपचे शहर जिल्हा सचिव संदीप पवार यांना ''द मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड, दिल्ली'' यांच्या वतीने मानद डॉक्टर पदवी प्रदान करण्यात आल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष अनंत राठोड, जिल्हा उपाध्यक्ष विजय वडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संदीप पवार यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना मोठा आधार मिळत असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''संदीप पवार यांनी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी 'आधार सामाजिक संस्था'च्या माध्यमातून अनेक गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला आहे. तसेच राजकीय पदाचा वापर ते समाजकारणासाठी करत असून, अशा व्यक्तींना मिळणारे सन्मान हे संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. ही मानद डॉक्टर पदवी त्यांच्या कार्याचा सन्मान असून, पुढील काळातही ते अधिक जोमाने समाजकार्यात योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना संदीप पवार म्हणाले की, ''मला मिळालेला हा सन्मान माझा नसून, माझ्या सोबत कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा आणि समाजाचा आहे. समाजातील गरजू लोकांसाठी काम करताना अनेक अडचणी येतात, मात्र लोकांच्या आशीर्वादामुळे आणि सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. ही मानक डॉक्टर पदवी मला पुढील काळात अधिक जबाबदारीने आणि समर्पणाने काम करण्याची प्रेरणा देणारी आहे. भविष्यातही समाजहिताचे विविध उपक्रम राबवून सर्वसामान्यांच्या सेवेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे ते म्हणाले. उपस्थितांनी संदीप पवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शरणपूर वृद्धाश्रमात सेवाप्रीतची रामनवमी सामाजिक उपक्रमांनी साजरी

**वृद्धाश्रमात सेवा, स्नेह आणि आनंदाची उधळण; आजी–आजोबांसाठी किराणा, साहित्य व जीवनावश्यक वस्तूंची भेट**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नेवासा तालुक्यातील फत्तेपूर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमात रामनवमी उत्सवाचे औचित्य साधत एक आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी–आजोबांना महिनाभर पुरेल इतका किराणा, फर्निचर साहित्य तसेच व्हील चेअर, वॉकर यांसारख्या जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. तसेच ऋणानुबंध ग्रुपने श्रीरामची भजणे गाऊन कार्यक्रमत रंगत आणली.




या उपक्रमाची संकल्पना फाउंडेशनच्या अध्यक्षा जागृती ओबेराय व प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी साकारली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने आणि स्नेहाने मदत करण्याचा उद्देश यामागे होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर वृद्धाश्रमातील आजी–आजोबांवर फुलांची वृष्टी करून त्यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी वृद्धांमध्येच श्रीरामाचे रूप पाहून त्यांची सेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या भजन संध्या कार्यक्रमाने वातावरण अधिक भक्तिमय झाले. फाउंडेशनच्या महिला सदस्यांनी सादर केलेल्या श्रीराम भक्तिगीतांनी उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना स्वादिष्ट मिष्टान्न भोजन देण्यात आले. या प्रेमळ आदरातिथ्यामुळे आजी–आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

जागृती ओबेराय यांनी प्रेम, माया आणि सेवाभाव यांचा संदेश दिला. तसेच जीवनाचे मोल समजून घेण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, प्रभू श्रीराम हे केवळ देव नसून ते आदर्श जीवनाचे प्रतीक आहेत. त्यांच्या जीवनातून आपण सेवा, त्याग, कर्तव्य आणि प्रेम यांचे मूल्य शिकतो. आज आम्ही शरणपूर वृद्धाश्रमात आलो आहोत, कारण येथे राहणाऱ्या प्रत्येक आजी–आजोबांमध्ये आम्हाला श्रीरामाचेच रूप दिसते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान हेच आमच्यासाठी सर्वात मोठे पुण्य आहे. समाजात अनेक वेळा ज्येष्ठ नागरिक एकाकी होतात, त्यांना आधाराची गरज असते. अशा वेळी आपण सर्वांनी त्यांच्याप्रती आपली जबाबदारी ओळखून त्यांना प्रेम, सन्मान आणि आधार देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. त्यांनी उपस्थित सर्व ज्येष्ठांना आनंदी, समाधानी आणि निरोगी राहण्याचा संदेश दिला तसेच सेवाप्रीत फाउंडेशन त्यांच्या पाठीशी कायम उभे राहील, अशी ग्वाही दिली. व त्यांनी आजोळी आल्यासारखे वाटले असे सांगितले.

या कार्यक्रमाला फाउंडेशनच्या सदस्यांमध्ये सौ. पूजा गंडाळ, सुरेखा बारस्कर, माधवी दांगट, मीरा बारस्कर, दीपाली देऊळकर, दीपा रोहिडा, पूनम आहुजा, स्मिता देशमुख, टीना राकेशकुमार, अंजली गायकवाड, देवयानी गुणे यांची उपस्थिती होती. तसेच शरणपूर वृद्धाश्रम कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब मुटकुळे, सचिव सुरेखा मगर, संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण, उपसरपंच दत्तात्रय गवते, फत्तेपूरचे सरपंच बाबासाहेब शेख आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवत्तेची वैभवशाली परंपरा कायम - डॉ. रमेश झरकर

**। भारत विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार । भारत विद्यालयाच्या शिरपेचात मनाचा तुरा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत विद्यालयाची गुणवत्ता ही मिरजगाव परिसरामध्ये आग्रक्रमाने ओळखली जाते ही गुणवत्तेची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे. असे प्रतिपादन विद्यालयाचे चेअरमन आणि हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले. विद्यालयामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते.याप्रसंगी अरिहंत पतसंस्थेचे चेअरमन पंकज धोंगडे,जिल्हा ग्रामीण आरोग्य केंद्र मिरजगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दराडे,उद्योजक संजय बगाडे,गणेश झरकर,शालेय समिती सदस्य सौ. अर्चना गोरे आदींसह पालक उपस्थित होते.

मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा आदी मान्यवरांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आणि शाळेच्या भौतिक विकासाच्या दृष्टीने राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.भौतिक विकासाकरिता समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. त्याबरोबरच नवोदय विद्यालया मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्येही विद्यालयाचा विद्यार्थी निवडला गेला आहे. परीक्षेमध्ये एकूण १९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्ती करताना निवड झाली आहे. कु.पूर्वा वायाळ ही विद्यार्थिनी१४९ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.तर नवोदय विद्यालयाकरिता विद्यालयाचा कार्तिक शिंदे हा विद्यार्थी निवडला गेला आहे.

या सर्वच विद्यार्थ्यांचा विद्यालया मार्फत पालकांच्या उपस्थिती मध्ये सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमाकरिता मोठ्या प्रमाणात पालक आणि मिरजगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल यांनी सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला आणि पुढील यशाकरता शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बोलताना पंकज धोंगडे यांनी विद्यालयाच्या गुणवत्तेबाबत प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी आपण सर्वतोपरी मदत करण्याचे मान्य केले.

# राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत जय बजरंग विद्यालयाचे यश

**२५ विद्यार्थी राज्य, जिल्हा व केंद्रीय गुणवत्ता यादीत झळकले विद्यार्थ्यांनी उमटवला शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** पाईपलाईन रोड येथील आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालय येथील प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा संवर्धन संचलित राज्यस्तरीय प्राविण्य परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी राज्य, जिल्हा तसेच केंद्रीय गुणवत्ता यादीत झळकले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटवला आहे.

राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत चमकलेले विद्यार्थी इयत्ता पहिली : आडसरे श्रीनिधी गणेश (राज्यात द्वितीय), अनारसे कादंबरी योगेश (राज्यात तृतीय) इयत्ता दुसरी : घुले ईशान दीपक (राज्यात द्वितीय) इयत्ता सहावी : क्षीरसागर सिद्धेश अमोल (राज्यात द्वितीय) जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी इयत्ता पहिली : परळकर अनिरुद्ध अक्षय (जिल्ह्यात प्रथम), आहेर नियती वैभव (जिल्ह्यात द्वितीय)इयत्ता दुसरी : आव्हाड अंजली रवींद्र (जिल्ह्यात द्वितीय), आव्हाड स्वरा रवींद्र (जिल्ह्यात चतुर्थ)इयत्ता सातवी : कुशवाह अभिषेक प्रभाशंकर (जिल्ह्यात प्रथम), उबाळे पियुष बाळासाहेब (जिल्ह्यात चतुर्थ)

केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत झळकलेले विद्यार्थी इयत्ता पहिली : गुंजाळ युग अनिल (केंद्रात चतुर्थ), विश्वकर्मा तानिया जितेंद्र (केंद्रात पंचम), बरबडे कृष्णप्रिया प्रवीण (केंद्रात पंचम)

इयत्ता दुसरी : वारे प्रथमेश अशोक (केंद्रात पंचम) इयत्ता तिसरी : घुले दर्शन गणेश (केंद्रात द्वितीय) इयत्ता चौथी : बरबडे प्रेरणा प्रवीण (केंद्रात तृतीय), इयत्ता पाचवी : आडसरे श्रीलेखा गणेश (केंद्रात द्वितीय), कुलकर्णी आयुष अमृत (केंद्रात तृतीय), ठोकळ आरोही शंकर (केंद्रात चतुर्थ), मेहेत्रे कृष्णा कैलास (केंद्रात चतुर्थ), पवार शिवानी प्रवीण (केंद्रात पंचम)

इयत्ता सहावी : क्षीरसागर आदेश अमोल (केंद्रात प्रथम), भवार श्रद्धा तुकाराम (केंद्रात द्वितीय), भोसले श्रीराज गणेश (केंद्रात तृतीय), पवार साक्षी कृष्णा (केंद्रात चतुर्थ)

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेशजी गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी अभिनंदन केले.





श्री भगवान महावीर जंयती निमित्त अहिल्यानगर शहरात ठीकठिकाणी चोक सजावट करण्यात आली होती ( छाया – राजू खरपुडे ,नगर)

# वकील, न्यायालयीन कर्मचारी व कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवचासाठी महत्त्वपूर्ण बैठक

## आयुष्मान भारत व महात्मा फुले योजनांचा संयुक्त लाभ देण्याचा पुढाकार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील वकील, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवच मिळावे या उद्देशाने जिल्हा न्यायालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना या योजनांचा संयुक्त लाभ सर्व पात्र घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

ही बैठक प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, दक्षता अधिकारी व्ही. बी. वांडेकर, टीम लीडर हर्षवर्धन साळवे, पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी तसेच ॲड. अमित थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्व पात्र घटकांना या योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे १० हजार कुटुंबांना मोफत व कॅशलेस वैद्यकीय उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.

अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, या योजनांमुळे गंभीर आजारांवरील उपचार, रुग्णालयीन खर्चासाठी आर्थिक संरक्षण तसेच व्यापक आरोग्य सुरक्षा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेत कार्यरत वकील व कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी ॲड. कारभारी गवळी यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, ''आरोग्य हा हक्क आता संरक्षणही'' या संकल्पनेला बळ देणारा हा निर्णय असल्याचे सांगितले. समाजातील सेवाभावी घटकांसाठी ही योजना आरोग्य सुरक्षा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. न्यायव्यवस्थेतील घटकांना केवळ सेवा देण्याची जबाबदारी नसून त्यांच्या आरोग्याचीही खात्री मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी संबंधित लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

# श्रीराम नवमी निमित्त माऊली सभागृहात गीतरामायणाची सुरेल मैफल

## नगरकर मंत्रमुग्ध; संगीत, कथा आणि नृत्याचा संगम; नगरकरांनी अनुभवला रामभक्तीचा आनंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जय श्रीराम श्रीरामनवमीच्या पावन दिनी माऊली सभागृहात संपन्न झालेल्या श्री प्रसादजी सोन्याबापू शेटे प्रस्तुत गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला रामभक्त नगरकरांचा उदंड प्रतिसाद लाभला. वेळेपूर्वीच तुडुंब भरलेलं माऊली सभागृह, कार्यक्रम सुरू झाल्यानंतर बाहेर माऊली सभागृहाच्या प्रांगणात एलईडी स्क्रीन समोर मोठ्या संख्येने उपस्थित भाविक नगरकर बघून हेच म्हणावसं वाटतं की आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर आणि स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या दैवी प्रतिभेतून निर्माण झालेल्या गीतरामायणाची गोडी आजही टिकून आहे.

कवी श्रेष्ठ रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे रामायण ही खरोखरच भारताच्या मौलिक भावभावनांची भागीरथी आहे. भारतीय संस्कृती रामरसात सतत भिजत आलेली आहे आणि गीत रामायण म्हणजे वाङ्मय शारदेच्या रत्नजडित मुकुटातील शिरोमणीच. याची पुनःप्रचिती यावर्षी देखील नगरकरांनी अनुभवली. गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर श्री प्रसादजी शेटे यांच्या पुढाकारातून आणि मुख्य स्वरातून साकारलेल्या गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला आबाल वृद्ध नगरकरांनी




प्रचंड गर्दी,उत्स्फूर्त टाळ्या आणि तोंड भरून दाद देत उदंड प्रतिसाद दिला.

गीत रामायणातील ५६ गीतांपैकी स्वये श्री रामप्रभू ऐकती,कुशलव रामायण गाती, दशरथा घे हे पायस दान, ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा,नकोस नौके परत फिरू ग,सेतू बांधा रे सागरी, भूवरी रावण वध झाला, प्रभो मज एकच वर द्यावा, गा बाळांनो श्रीरामायण यांसह निवडक २१ गाणी गायली गेलीत. गायकांचे उत्तम स्वर, वादकांची उत्तम साथ आणि सोबत रामकथेची सुयोग्य गुंफण असा त्रिवेणी संगम या मैफिलीत जुळून आला. यावर्षीच्या मैफिलीचे प्रमुख आकर्षण होते, ज्यांनी खुद्द बाबूजी अर्थात सुधीर फडके यांना गीतरामायण कार्यक्रमांमध्ये साथ केलेली आहे असे दिग्गज व्हायोलिन वादक पंडित रमाकांत जी परांजपे यांची व्हायोलिनची साथ. पुण्याचे श्री शैलेश देशपांडे यांनी बासरी आणि संगमनेरचे श्री सत्यजित सराफ यांनी सिंथेसायझरची साथ केली. सोबत अहिल्यानगरचे ज्येष्ठ संगीत गुरु श्री मकरंद खरवंडीकर सर यांनी हार्मोनियमची साथ केली.तबला साथ होती श्री हर्षद भावे आणि श्री प्रसाद सुवर्ण पाठकी यांची तर तालवाद्य साथ होती श्री कुलदीप चव्हाण यांची.

श्री प्रसाद जी शेटे यांच्यासह त्यांची कन्या सौ श्रद्धा बाजारे शेटे आणि नगरच्या सौ रेणुका पवार या दोघींनी सीता, कौसल्या, अहिल्या,शबरी यांच्या तोंडची गाणी सुरेल गायली. कोरस साथ होती कुमारी नेहा दरवडे आणि कुमारी गौरी पवार यांची. गायक वादकांच्या उत्तम सादरीकरणासोबतच या मैफिलीची जमेची बाजू म्हणजे सौ वीणा दिघे यांचे रामकथेचे प्रभावी प्रगल्भ निरूपण. शेवटपर्यंत प्रेक्षकांना रामकथेमध्ये गुंतवून ठेवण्यात गायक वादक निवेदक यशस्वी ठरले.


यावर्षी गीत रामायणातील काही गाण्यांसाठी श्री प्रसादची शेटे यांच्या स्नुषा सौ श्रद्धा शेटे यांनी सादर केलेले कथक नृत्य हे आणखीन एक आकर्षण ठरले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सन्माननीय प्रायोजक होते प्रोॲक्टिव्ह लाईफ स्टाईल,आरोग्य सदन हॉस्पिटल,बजाज पॉवर इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडोस्कल्प.

विशेष सहकार्य होते गजराज ड्रायक्लीनर्स, विमा प्रतिनिधी मंगेश राजहंस देसाई, कमल फूड्स स्पेशल नगरी झटका, साई सूर्य नेत्रसेवा,ओंकार एंटरप्राइजेस, पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था,द ग्रँड लेगसी महाबळेश्वर,श्री राधे ट्रेडर्स राहुरी,नक्षत्र फूड प्रॉडक्ट्स,संदीप बोरवेल, श्री रवींद्र शेटे मॅक्स लाइफ इन्शुरन्स,जरीवाला स्टोअर्स,माय केअर प्लस आणि नेट विंड यांचे.

शिवाय गीतरामायण कमिटीचे अध्यक्ष श्री सुरेश काका चव्हाण, उपाध्यक्ष श्री राजहंस देसाई आणि सर्व सदस्य श्री सुभाषराव मिसाळ,श्री राजेंद्र दासरी, श्री बाळासाहेब परभणे,श्री भास्कर मिसाळ आणि श्री जयंत येलूलकर या सर्वांनी विशेष मेहनत घेतली.

# बहिरोबावाडी येथे पाचवा बिबट्या जेरबंद !

## शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश !



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** तालुक्यातील किन्ही - बहिरोबावाडी येथे २ डिसेंबर रोजी बिबट्याच्या हल्ल्यात कै.भागुबाई विश्वनाथ खोडदे या महिलेचा मृत्यू झाला होता.या घटनेमुळे किन्ही - बहिरोबावाडी परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते परंतु वनविभागाच्या वतीने बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जात नव्हत्या त्यामुळे संतप्त नागरिकांनी शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ८ डिसेंबर रोजी नगर - कल्याण महामार्गावर भव्य रास्तारोको आंदोलन केले होते त्यानंतर वन विभागाने तातडीने या परिसरात जास्तीत पिंजरे लावून तत्सम उपाययोजना करत गावातील युवकांच्या सहकार्याने चार बिबट्यांना जेरबंद केले होते गेल्या तीन महिन्यांपासून ही मोहीम सुरूच ठेवण्यात आली होती परंतु बराच कालावधी लोटला तरी बिबट्या पिंजऱ्यात येत नव्हता तथापि पाळीव प्राण्यांवर हल्ले मात्र सुरूच होते अखेर शनिवारी व रविवारी सलग दोन दिवस बहिरोबावाडी येथील महादेव मंदिर परिसरात दोन बिबट्यांचा वावर असल्याचे नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर त्या ठिकाणी तातडीने पिंजरा लावण्यात आला पिंजरा रविवारी दुपारी लावल्यानंतर सोमवारी पहाटेच्या सुमारास एक बिबट्या या पिंजऱ्यात अलगदपणे अडकला परंतु दुसरा बिबट्या बाहेर राहिल्याने त्याने सावज ठेवलेला पिंजरा जवळपास पंधरा फुट अंतरावर ओढत नेत अडकलेल्या बिबट्याच्या सुटकेसाठी आटोकाट प्रयत्न केल्याचे दिसत आहे.दोनपैकी एक बिबट्या जेरबंद करण्यात यश आले जरी असले तरी मादी अजूनही बाहेर असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण कायम आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शेतकरी नेते अनिल देठे पाटील, गंगाधर देठे, बबन देठे, विनोद खोडदे, अभिजीत खोडदे, नितिन खोडदे, संग्राम खोडदे ,गोरख खोडदे, रामदास देठे, बाबाजी देठे, भिमाजी देठे या ग्रामस्थांसह, गजानन धाडे वनपरिक्षेत्र अधिकारी पारनेर प्रादेशिक यांच्या मार्गदर्शनाखाली के.एस.साबळे, वनपाल भाळवणी एन.व्ही.बडे,वनरक्षक कान्हुर पठार बी.एस.दवणे, वनरक्षक भाळवणी दत्तू नर्हे, वनसेवक किशोर गुंजाळ, वनसेवक दिंगबर विरोळे वाहन चालक यांचे विशेष सहकार्य लाभले.

किन्ही – बहिरोबावाडी परिसरात डोंगर दऱ्या मोठ्याप्रमाणात असल्याने या भागात बिबट्यांचा मोठ्या संख्येने अधिवास आहे परंतु त्यांच्या उपद्रवामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता त्यामुळे आम्ही गावातील युवकांच्या सहकार्याने वन विभागाच्या माध्यमातून बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले व आमच्या प्रयत्नांना देखील चांगले यश मिळाले असून आतापर्यंत पाच बिबटे आम्ही जेरबंद करण्यात यशस्वी झालो आहोत परंतु अजूनही या परिसरात चार ते पाच बिबट्यांचा वावर असुन त्यांनाही जेरबंद करावे लागणार आहे.

अनिल देठे पाटील ( शेतकरी नेते )

# अवकाळी पावसाचा जोरदार तडाखा; पैठण तालुक्यात शेतीचे मोठे नुकसान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** विजांच्या कडकडाटासह सोमवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसाने पैठण तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले. अचानक कोसळलेल्या या पावसामुळे शेतीपिकांसह इतर व्यवसायांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.

तालुक्यातील अनेक भागांत कलिंगड, चिंच तसेच सोंगणीला आलेल्या गव्हावर पावसाचा मोठा परिणाम झाला. काढणीच्या उंबरठ्यावर असलेली पिके भिजल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. याशिवाय उन्हाळी बाजरीचेही नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.



दरम्यान, जनावरांसाठी साठवून ठेवलेला कडबा भिजल्याने पशुपालकांनाही मोठा फटका बसला आहे. अचानक आलेल्या पावसामुळे कडबा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. या अवकाळी पावसाचा फटका विटभट्टी व्यवसायालाही बसला असून, तयार विटा भिजल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे विटभट्टी चालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# शिर्डीत भगवान महावीर जयंती उत्साहात, सकल जैन समाजाच्या एकजुटीचे दर्शन..!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी–** शिर्डी शहरात आज महावीर जयंतीचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. सकाळी द्वारकामाई मंदिरासमोरील जैन स्थानक येथून या भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. या शोभायात्रेत शहरातील सर्व जैन बंधू-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या शोभायात्रेच्या सुंदर सजवलेला रथ होता, ज्यामध्ये भगवान महावीरांची विलोभनीय प्रतिमा विराजमान करण्यात आली होती.

पारंपारिक वेशभूषेत असलेले समाज बांधव आणि मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महिला यामुळे शोभायात्रेला एक वेगळीच भव्यता प्राप्त झाली ही शोभायात्रा पालखी रोडवरून मार्गस्थ होत कनकुरी रोडवरील जैन काच मंदिरात पोहोचली.

या ठिकाणी जैन समाजाच्या वतीने भगवान महावीरांच्या मूर्तीला मंगल स्नान आणि जलाभिषेक करण्यात आला. अत्यंत भक्तीमय वातावरणात मूर्तीचे पूजन करून विश्वशांतीसाठी प्रार्थना करण्यात आली. जैन मंदिरातील पूजा अर्चा आटोपल्यानंतर ही शोभायात्रा पुन्हा श्री साईबाबा मंदिराकडे मार्गस्थ झाली. श्री साईबाबा मंदिराला



प्रदक्षिणा घालून या भव्य शोभायात्रेची सांगता करण्यात आली.

सकल जैन समाज या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र आल्याने शिर्डीत एकतेचे आणि भक्तीचे दर्शन घडले. याचबरोबर जैन स्थानकात समाजातील चिमुकल्या मुलां मुलींनी आपले कलागुण सादर करत जैन समाजातील माता पित्यांचे स्थान,धर्माची शिकवण व संस्काराचे दर्शन घडविले त्यानंतर शिर्डी नगरपरिषदेत नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात,आरोग्य सभापती दीपक गोंदकर,नगरसेवक निलेश दादा कोते,नगरसेवक अमित शेळके,वसंत गोंदकर,नगरसेवक बापू ठाकरे,किरण कोते,गणेश सोनवणे,सुधीर शिंदे यांसह मान्यवरांच्या उपस्थितीत भगवान महावीरांची जयंती साजरी करण्यात आली.

(पान १ वरून)

## घोडेगाव स्वतंत्र पाणीयोजनेच्या तलावात तीनजण बुडाले

घोडेगाव येथील मुळा पाटबंधारे सिंचन शाखेच्या कार्यालयाच्या शेजारी सध्या घोडेगाव स्वतंत्र पाणीयोजनेच्या नूतन तलावाचे काम सुरू आहे. घोडेगाव-सोनई रस्त्यावर असलेल्या या तलावाच्या अंदाजे शंभर मीटर अंतरावर पाट आहे. सध्या तलावाच्या भिंतीच्या पायाचे काम सुरू असून, पायाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी पाटाच्या पाण्याचा भूमिगत पाझर (पर्क्युलेशन) होत असल्याने या ठिकाणी मोठा डोह तयार झालेला आहे. या ठिकाणी स्थानिक नागरिक, मुले, तरुणांची सातत्याने वर्दळ असते. काहीजण परिसरात पोहण्यासाठी म्हणून जात असतात.

दरम्यान, सदर तलावाचे काम बारामतीच्या एका कंपनीने घेतलेले असून, के. के. थोरात नावाचा उपक्रंत्राटदार याचे काम पाहत आहे. पाटपाण्याचा व वर्दळीचा भाग असल्याने स्थानिकांना धोका होऊ शकतो हे लक्षात घेऊन काम चालू असलेल्या ठिकाणी दिशादर्शक व धोकादायक असल्याचे माहितीफलक फलक लावणे आवश्यक होते. परंतु संबंधित विभागाने वारंवार सूचना देऊनही ठेकेदाराने याकडे दुर्लक्ष केले. त्यातूनच आज तीनजणांना पाया बांधकामाच्या ठिकाणी तयार झालेल्या डोहातील पाण्याची कल्पना आली नाही व तिघेही बुडाले. दुपारी साडेतीनच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर स्थानिकांनी बुडालेल्यांचा शोध सुरू केला. कॉन्स्टेबल तुपे व कॉन्स्टेबल गावडे हे घटनास्थळी तातडीने दाखल झाले व त्यांनी मदतकार्याला गती दिली. सायंकाळपर्यंत स्थानिक काळे नामक व्यक्तीचा मृतदेह हाती आला, तर उर्वरित दोघांचा शोध सुरू होता. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, ठेकेदाराच्या बेजबाबदारपणाबद्दल संतापाची भावना आहे.

## भगवान महावीरनिमित्त नगरमध्ये शोभायात्रा

महाराज आदिठाणा, महासतीजी सेवाभावी पू. सत्यप्रभाजी म.सा., पू दिव्य र्शनाजी म.सा., पू.सम्यक दर्शनाजी म .सा., पू. कंचनकवरची म.सा., पू . अर्चनाजी महाराज (मीरा), पू. चंदनबालाजी म.सा, पू. राजस्थानी प्रवर्तनी सुधाजी म.सा., पू. अनूपज्योतीजी म.सा., पू. आभाजी म.सा. आदि समस्त विराजित महासतीजी आदी साधूसाध्वीजींच्या उपस्थितीत प्रवचन तथा गुणगाण झाले. ब्राम्ही युवती मंचच्या सदस्यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर केली. जैन कॉन्फरन्सच्या अंतर्गत महिलांनी डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली बेटी बचाव बेटी पढाओची शपथ घेतली. यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत, कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, अशोक (बाबूशेठ) बोरा, संतोष गांधी, डॉ. सुधा कांकरिया आदी उपस्थित होते. जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी भगवान महावीर जीवन मनोगत करून विविध स्पर्धांचा निकाल जाहीर केला. चौक सजावट स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे- प्रथक क्रमांक- गुगळे परिवार (चितळे रोड), व्दितीय क्रमांक - बोथरा परिवार (आडते बाजार), तृतीय - दिगंबर जैन मंदिर, महाजन गल्ली, उत्तेजनार्थ - जय आनंद फौंडेशन, आडते बाजार, जय आनंद महावीर युवक मंडळ, नवीपेठ, वर्धमान तरूण मंडळ, ख्रिस्त गल्ली.

## उपमहापौर धनंजय जाधव यांनी सादर केला ५० दिवसांचा कार्य अहवाल

पावती अहवाल स्वीकारल्यानंतर नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपमहापौरांच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले. लोकप्रतिनिधीने आपल्या कामाचा अहवाल जनतेसमोर आणि पक्षासमोर ठेवणे ही पारदर्शक कारभाराची पावती आहे, अशा शब्दांत त्यांनी जाधव यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, ''पालकमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली आणि पक्ष संघटनेच्या सोबतीने शहराचा कायापालट करण्याचा आमचा मानस आहे. हे केवळ ५० दिवसांचे काम असून, आगामी काळात शहराच्या प्रलंबित प्रश्नांची तड लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'' या अहवाल सादरीकरणामुळे राजकीय वर्तुळात उपमहापौर धनंजय जाधव यांच्या कामाची चर्चा होत असून, सामान्य नागरिकांमधूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस तात्काळ अटक करा

तीव्र आंदोलन छेडले जाईल.''दरम्यान, संबंधित व्यक्तीला अटक न झाल्यास दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मिरजगाव येथील क्रांती चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही बहुजन समता पार्टीच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच, या गंभीर प्रकरणामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून पीडित कुटुंबीयांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून संबंधित व्यक्तीला अटक करावी, अशी मागणी विविध स्तरातून होत आहे.

## संतांच्या आशीर्वादाने सेवा कार्याला मिळते सातत्य – उपमहापौर धनंजय जाधव

म्हणाले की,गेल्या ३५ वर्षांपासून या हॉस्पिटलने अखंडितपणे रुग्णसेवा केली असून, लाखो रुग्णांना नवजीवन दिले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी खर्चात आणि उच्च दर्जाची सेवा देण्याचा प्रयत्न येथे होत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळत असून, भविष्यातही अशा सेवा अधिक विस्तारल्या जाव्यात, अशी अपेक्षा आहे.